
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार , 16 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 126 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

# जलसमृद्ध परळीच्या दिशेने मोठी झेप जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली परळीत जलक्रांतीची तयारी



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

प्रभु वैद्यनाथांच्या पावन भूमीला दुष्काळाच्या सावटातून कायमचे बाहेर काढत जलसमृद्ध परळी घडविण्याच्या दिशेने ग्लोबल विकास ट्रस्टने आणखी एक महत्त्वाकांक्षी पाऊल टाकले आहे. जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली परळी शहरालगतच्या घनशी नदी (वेणूमती), सरस्वती आणि ब्रह्मगंगा या प्रमुख नद्या तसेच त्यांच्या उपनद्यांचे अंदाजे ५० किलोमीटर अंतराचे पुनरुज्जीवन करण्याचा ऐतिहासिक संकल्प करण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या प्रत्यक्ष सर्व्हेच्या कामाला मंगळवार, दि. १५ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला.





## शहरासह अनेक गावांना मिळणार जलसमृद्धीचा लाभ

हा उपक्रम केवळ परळी शहरापुरता मर्यादित नसून चांदापूर, कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, संगम, वाघबेट आणि कौठळी यांसह परिसरातील अनेक गावांना त्याचा लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नद्यांचे पुनरुज्जीवन, नदीपात्रातील पाण्याचा प्रभावी साठा आणि भूजलपातळी वाढविण्याच्या माध्यमातून शहर आणि ग्रामीण भागाला जलसुरक्षेच्या एका व्यापक संकल्पनेत जोडण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.

## ग्लोबल रिव्हर आक्वाशाफ्ट (GRA) तंत्रज्ञानाचा वापर

नदीपात्राचे पुनरुज्जीवन करताना पाणी जमिनीत खोलवर मुरावे आणि भूजल पातळी कायमस्वरूपी वाढावी, यासाठी 'ग्लोबल रिव्हर आक्वाशाफ्ट' (GRA) ही आधुनिक संकल्पना राबवली जाणार आहे. यामुळे संपूर्ण परिसराला दीर्घकालीन जलसुरक्षा लाभेल.

## लोकसहभागातून जलचळवळ

हा उपक्रम केवळ प्रशासकीय न राहता जनतेची चळवळ बनावी, यासाठी गावनिहाय समन्वय समित्या स्थापन करून नागरिकांचा थेट सहभाग घेतला जाणार आहे. यापूर्वी ग्लोबल विकास ट्रस्टने परळी, अंबाजोगाई, माजलगाव आणि धारूर तालुक्यांत ११९ किलोमीटर नद्यांचे यशस्वी पुनरुज्जीवन करून कमी पावसातही पाणी टिकवून दाखवले आहे. याच अनुभवाच्या बळावर आता परळी शहराचा कायापालट करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांच्या उपस्थितीत नागरिकांना या महायज्ञात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

- परळीची जलसमृद्धीकडे ऐतिहासिक झेप जलनायक मयंक गांधी यांच्या नेतृत्वात ५० किमी नद्यांच्या पुनरुज्जीवनाला होणार सुरुवात!
- परळीच्या जलसमृद्धीची ऐतिहासिक सुरुवात शहरालगतच्या नद्यांच्या पुनरुज्जीवनाला वेग
- परळीच्या भविष्यातील जलसुरक्षेसाठी ऐतिहासिक पाऊल शहरालगतच्या नद्यांचे होणार पुनरुज्जीवन
- दुष्काळाच्या सावटातून परळीला बाहेर काढण्यासाठी जलचळवळ
- या बैठकीस नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# बळीराजा मरण यातनेत, मायबाप सरकार गाढ झोपेत! सरकारला जागे करण्यासाठी किसान सभेचा 'रस्ता रोको' एल्गार

■ परळी / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि राज्याच्या काही भागात दुष्काळाच्या झळा तीव्र झाल्या असून पावसाची तब्बल ५० टक्के तूट निर्माण झाली आहे. एकीकडे नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्यांचे सत्र वाढत असताना, सरकार मात्र गाढ झोपेत असल्याचे संतापजनक चित्र समोर आले आहे. याच झोपलेल्या आणि असंवेदनशील व्यवस्थेला जागे करण्यासाठी किसान सभेच्या वतीने मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पूर्वदिनी म्हणजेच १६ सप्टेंबर रोजी किसान सभा बीड च्या वतीने बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी तीव्र 'रस्ता रोको' निदर्शने करण्यात येणार आहेत.

यंदा पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यात व मराठवाड्यात भयानक दुष्काळी परिस्थिती ओढवली आहे. सरासरीच्या तुलनेत ५० टक्क्यांहून अधिक पावसाची तूट असल्याने खरिपाचा हंगाम पूर्णपणे करपून गेला आहे. पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आतापासूनच आ वासून उभा आहे. हातातोंडाला आलेला घास हिरावल्याने शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.डोक्यावरील कर्जाचा डोंगर या नैराश्येतून शेतकरी आत्महत्यांच्या संख्येत मोठी आणि चिंताजनक वाढ झाली आहे. जिल्ह्यात आणि मराठवाड्यात भीषण परिस्थिती असताना, राज्याचे सरकार मात्र निव्वळ बघ्याची भूमिका घेत आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देण्याऐवजी, सत्ताधारी केवळ आपल्या राजकीय साठमारीत मग्न आहेत. 'मायबाप' म्हणवून घेणारे सरकार शेतकऱ्यांच्या



मरणयातनांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची संतप्त भावना आता जनमानसात उसळत आहे. पंचनामे, तातडीची मदत, दुष्काळ जाहीर करणे या सर्वच आघाड्यांवर सरकार सपशेल अपयशी ठरले आहे.

बधिर आणि निगरगट्ट झालेल्या सरकारचे कान उघडण्यासाठी किसान सभेने आता रस्त्यावर उतरण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे. बुधवार दि १६ सप्टेंबर, 'मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पूर्वदिनाचे औचित्य साधून किसान सभेकडून बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी चक्का जाम आणि 'रस्ता रोको' आंदोलन करण्यात येणार आहे. निजामशाहीला उलथवून टाकणाऱ्या याच मराठवाड्याच्या भूमीत आता शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी एकजुट होऊन सरकारविरुद्ध महाएल्गार पुकारला असून सरकार बदलण्यात देखील मागेपुढे पाहणार नाही. सरकारने आता तरी एसी केबिनमधून बाहेर पडून शेतकऱ्यांचे अश्रू पुसावेत, अन्यथा हा 'रस्ता रोको' केवळ एक सुरुवात असेल असा सज्जड इशारा किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी परळी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे. या पत्रकार परिषदेस किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे,कॉ.पी एस घाडगे, कॉ.भगवान बडे, कॉ.प्रा. खाडे सर,कॉ.पांडुरंग राठोड आदी उपस्थित होते.

# संपादकीय

## बिघडलेल्या हवेचे वर्तमान

मुंबईची हवा सध्या पूर्ण बिघडली आहे. राजकारणाने नाही; हवेतील धुलीकणांनी. राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका सुरू असल्याने राजकीय धुरळा सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उडतो आहे. मुंबईलगतच्या जिल्ह्यांमध्ये नेत्यांच्या झुंजी लागल्या आहेत. पण, महानगरपालिकांच्या क्षेत्राने वेढलेल्या मुंबईपासून या नगरपालिका थोड्या अंतरावर असल्याने त्या मैदानावरची धूळ मुंबईत पोहोचण्याचा प्रश्न नाही. मुंबईची हवा बिघडली आहे, ती मुंबईतल्याच घटकांमुळेच. सरकारी यंत्रणांनी याही बाबतीत आपल्यावरची जबाबदारीची धूळ झटकताना इथिओपियातील ज्वालामुखीचं कारण पुढे करून पाहिलं. पण, न्यायालयाने ऐकलं नाही. इथियोपियातल्या ज्वालामुखीतून उडालेल्या राखेचा काही अंश भारतीय अवकाशात आला आणि त्याचा काही भाग मुंबईच्या आकाशात पसरल्याने या आठवड्यात विमानसेवा विस्कळीत झाली होती, हे खरं. पण, न्यायालयाने या यंत्रणांना सुखासुखी सोडलं नाही. 'त्या राखेचं कारण सांगू नका. राख आली असली, तरी तिकडे ज्वालामुखीचा उद्रेक होण्याआधीही इथली हवा बिघडलेलीच होती. त्याचं कारण काय ते सांगा', असं न्यायालयानेच खडसावल्याने यंत्रणांना दुसरं कारण पुढे करावं लागलं. उगीच परकीय कारणांवर जबाबदारी झटकून मोकळं कशाला व्हायचं? बरं, या यंत्रणांना वायू प्रदूषण मान्य नाही, असं नाही. हे प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची यादी त्यांनी करून ठेवली आहे. वायू प्रदूषण किती पातळीपर्यंत सहन करायचं, प्रदूषणाची पातळी सलग तीन दिवसांपेक्षा अधिक २०० एक्यूआयपेक्षा वर राहिली, तर कोणी काय करायचं हेही ठरलं आहे. अधिकाऱ्यांच्या संयुक्त जबाबदाऱ्याही निश्चित आहेत. पण, तरीही 'शक्यतो काहीच करावं लागलं नाही तर उत्तम' या मुरलेल्या वृत्तीने इथिओपियाच्या ज्वालामुखीवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. हवेतलं वायू प्रदूषण मोजण्यासाठी मुंबईत अनेक ठिकाणी मापन यंत्र बसवलेली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयआयटी बॉम्बे आणि महानगरपालिका या तीनही यंत्रणांची यंत्र हवेची गुणवत्ता तपासत असतात. पण, दुर्दैवाने त्यात कुठेही सुसूत्रता दिसत नाही. अनेक यंत्र एकतर नादुरुस्त किंवा बंदच आहेत की काय कोणास ठाऊक? कारण, या यंत्रणांच्या अनेक केंद्रांवरची हवेच्या गुणवत्तेची आकडेवारी या महत्त्वाच्या दिवसांतही उपलब्ध नाही! याच यंत्रणेला न्यायालयाने आता सर्व बांधकामांच्या ठिकाणी हवेची शुद्धता मापक यंत्र बसवण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांच्या ठिकाणांची हवेची गुणवत्ता तपासा, जिथे हवा धोक्याच्या पातळीपर्यंत प्रदूषित असेल, तिथली बांधकामं तातडीने काही काळ थांबवा, असं न्यायालयाने आदेशात म्हटलं आहे. हे आदेश देताना अर्थात प्रकल्पाच्या आर्थिक गणिताचा विचार करायची सूचनाही केली आहे. न्यायालयाने दाखवलेली ही काळजी यंत्रणांसाठी (आणि संबंधित कंत्राटदारांसाठीही) पळवाट म्हणून उपयोगाला येईल, यात शंका नाही. दिल्लीतलं वायू प्रदूषण कमी दाखवण्यासाठी तिथल्या यंत्रणांनी हवेच्या गुणवत्ता मापक यंत्रांच्या भोवती पाणी मारण्यासाठी कसे टँकर लावले होते, हे आपण पाहिलेच आहेत. असे उपाय जे करतात, तेही याच प्रदूषित हवेतून श्वास घेतात. त्यांची कुटुंबही याच हवेतून प्राणवायू मिळवत असतात. पण, आपल्याकडे स्वतःच्या आणि इतरांच्या जगण्याच्या गुणवत्तेचा विचारच नसल्याने केवळ काही आमिषापोटी अशा गोष्टी केल्या जातात. आपण आपल्याबरोबरच इतरांचं आरोग्यही पणाला लावतो आहोत, याची जाणीव यांना नसते. त्यामुळे, मुंबईतही वेगळं काही घडेल, असं मानायला मन धजावत नाही. दिल्लीच्या वायू प्रदूषणाची तक्रार वर्षानुवर्ष आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब अशा जवळच्या राज्यांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातलं धसकट पेटवल्याने होणाऱ्या धुराने दिल्लीतली हवा बिघडते, असं वर्षानुवर्ष सांगितल्यानंतर यावर्षी या यंत्रणांनी वाहनांच्या वाढत्या उत्सर्जनाने हे प्रदूषण होतं आहे, असं सांगायला सुरुवात केली आहे. दिल्लीत घरात हवा शुद्ध करणारी यंत्र लागली आहेत. लोक ऑक्सिजनची पिशवी घेऊन, त्याची नळी नाकाला लावून फिरत नाहीत. पण ते दिवसही फार दूर नसतील. दिल्लीशी स्पर्धा करणाऱ्या मुंबईतही वेगळं काही घडणार नाही. समुद्रकिनारी असल्याचा फायदा नेहमी मिळत राहीलच असं नाही. ला निनाच्या प्रभावाने वाऱ्याच्या दिशा सतत बदलत आहेत. हे वारेच मुंबईचा श्वास कोंडल्याशिवाय राहणार नाहीत! महापालिकेने सध्या मुंबईतल्या वायू प्रदूषणाचं खापर शहरातील बांधकामांवर फोडलं असलं तरी ते एकमेव कारण नाही. कारवाईला जे सोपं असतं, ते कारण नेहमी पुढे केलं जातं. मुंबईतल्या प्रदूषणाला कारण वाहतूक कोंडीच आहे. सार्वजनिक व्यवस्था पंगू केल्याने मुंबईकरांना रोजच्या प्रवासासाठी खासगी गाड्या किंवा भाड्याने रिक्षा-टॅक्सी वापरण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. मुंबई वाढते आहे आणि मुंबईची आदर्शवत 'बेस्ट' सेवा रोडावते आहे. या सेवेच्या गाड्यांमध्ये वर्षागणिक वाढ व्हायला हवी होती, जुन्या मार्गांचे विस्तार व्हायला हवे होते, नवे मार्ग सुरू व्हायला हवे होते. प्रत्यक्षात यातलं काहीच होत नाही. रस्त्यांवरील अतिक्रमणांनी मार्गावर बस चालणं अवघड झालं आहे. ही सेवा उलट्या पायाने पळते आहे! त्यामुळे, मुंबईत गेल्या दहा वर्षांत चारचाकी वाहनांमध्ये तिप्पट आणि दुचाकींमध्ये पाचपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. रिक्षा-टॅक्सी बहुतांश सीएनजीवर चालताहेत. पण, सीएनजीसाठी त्यांना लांबच लांब रांगा लावाव्या लागताहेत. अनधिकृत रिक्षांचा सुळसुळाट, तर इतका आहे, की त्यांची संख्या एकूण संख्येच्या ३० टक्क्यांएवढी असावी, असा अंदाज आहे. मेट्रोच्या वापराचे आकडे जाहीर होतच असतात. तात्पर्य, मुंबईच्या हवेची गुणवत्ता वाहतुकीची गुणवत्ता सुधारल्याशिवाय शक्य नाही. ती सुधारणं महापालिकेला सहज शक्य आहे. त्यांनी ही जबाबदारी आपली मानली तर!

# गणेशोत्सवात धार्मिक परंपरेचा जागर; कुकडे कुटुंबीयांचा सप्तशृंगी देवीचा भव्य देखावा!

### कु. गौरी पुरुषोत्तम कुकडे व कुटुंबीयांचा आगळावेगळा उपक्रम; गेल्या वर्षी तुळजाभवानी, यंदा सप्तशृंगी देवीचे दर्शन

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

गणेशोत्सव म्हणजे केवळ उत्सव आणि रोषणाई नव्हे, तर आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांचा जागर करण्याचे प्रभावी माध्यम आहे. याच विचारातून परळी वैजनाथ येथील कु. गौरी पुरुषोत्तम कुकडे व कुटुंबीयांच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. मागील अनेक वर्षांपासून गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि जनजागृती चे संदेश देणारे देखावे साकारून कुकडे कुटुंबीयांनी समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

वैजनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या वैद्यनाथ गल्ली परिसरात यंदाही गणेशोत्सवानिमित्त आकर्षक व भव्य धार्मिक देखावा साकारण्यात आला आहे. यंदाच्या देखाव्यात श्रीक्षेत्र सप्तशृंगी देवी वणी यांच्या दिव्य आणि मनोहारी स्वरूपाचे दर्शन घडविण्यात आले आहे. देवीच्या आकर्षक मूर्तीची सजावट, धार्मिक वातावरण आणि देखाव्याची सुंदर मांडणी यामुळे परिसरातील भाविकांचे विशेष लक्ष वेधले जात आहे.

**■ गेल्या वर्षी तुळजाभवानीचे दर्शन**

**■ कुकडे कुटुंबीयांची ही धार्मिक देखावे साकारण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. गेल्या वर्षी आई तुळजाभवानीचे दर्शन घडविणारा देखावा साकारण्यात आला होता. त्या देखाव्याला नागरिक व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. त्याच धार्मिक परंपरेला पुढे नेत यंदा सप्तशृंगी देवीचा देखावा साकारण्यात आला आहे.**



**■ साडेतीन शक्तीपीठांपैकी सप्तशृंगी देवी अर्धपीठ**

**■ नाशिक जिल्ह्यातील वणी येथील श्रीक्षेत्र सप्तशृंगी देवी हे महाराष्ट्रातील अत्यंत श्रद्धास्थान मानले जाते. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी सप्तशृंगी देवीचे स्थान अर्धपीठ म्हणून मानले जाते. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात या शक्तिस्वरूप देवीचा देखावा साकारण्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.**

**■ 'सप्तशृंगी' म्हणजे सात शिखरांनी वेढलेले क्षेत्र. या पवित्र शक्तिस्थानाला महाराष्ट्राच्या धार्मिक परंपरेत विशेष स्थान आहे. देवीच्या दर्शनासाठी वर्षभर भाविकांची मोठी गर्दी होत असते. त्यामुळे घरगुती गणेशोत्सवाच्या माध्यमातून सप्तशृंगी देवीचे दर्शन आणि तिच्या धार्मिक महत्त्वाची ओळख नागरिकांना करून देण्याचा कुकडे कुटुंबीयांचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.**

**■ धार्मिकतेसोबत सामाजिक संदेश देण्याची परंपरा**

**■ कुकडे कुटुंबीयांनी गणेशोत्सवाचा उपयोग केवळ सजावट आणि मनोरंजनासाठी न करता धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यासाठी केला आहे. विविध वर्षांत वेगवेगळे विषय घेऊन देखावे साकारत त्यांनी समाजामध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनात धार्मिक व सांस्कृतिक मूल्ये जपण्याची गरज असताना, गणेशोत्सवाच्या माध्यमातून नव्या पिढीला आपल्या परंपरा, देव-देवता आणि संस्कृतीची ओळख करून देण्याचे काम या कुटुंबाकडून केले जात आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ एका कुटुंबाचा गणेशोत्सव न राहता श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम लक्षवेधी ठरत आहे. गणरायाच्या आगमनाने परिसरात आधीच भक्तिमय वातावरण निर्माण झाले असताना, त्यात सप्तशृंगी देवीच्या भव्य देखाव्याची भर पडल्याने वैद्यनाथ गल्ली परिसरात धार्मिक उत्साहाला . 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषासोबत देवीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जात असून, भाविकांकडून या देखाव्याचे मनापासून कौतुक केले जात आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धर्म, संस्कृती, सामाजिक संदेश आणि कलात्मकतेचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या कु. गौरी पुरुषोत्तम कुकडे व कुटुंबीयांचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आणि अनुकरणीय ठरत आहे.**

# पुराच्या जखमा अजून ताज्याच.. अनुदानाची प्रतीक्षा मात्र कायम? एक वर्षात देऊळगाव घाट करनी काय कमावलं? काय गमावलं?..

■ देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आज बरोबर एक वर्षांपूर्वी 15 सप्टेंबर 2025 या दिवशी रात्री झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे देऊळगाव घाट येथील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते.आज देऊळगाव घाटच्या त्या काळ्या दिवसाला एक वर्ष पूर्ण होत आहे. ही घटना 15 सप्टेंबर 2025 रोजी घडली होती. त्या दिवशी ढगफुटीसदृश्य पावसाने देऊळगाव घाट परिसराला अक्षरशः हादरवून सोडले होते. काही तासांच्या मुसळधार पावसाने नदी-नाल्यांना आलेल्या पुरामुळे अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले.त्या पुराची आठवण आजही अंगावर काटा आणते.पांडुरंग किसन दानवे यांची गुरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. घरातील संपूर्ण संसार डोळ्यादेखत पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. राजू रामदास ठोंबरे यांच्या घरातील संसारोपयोगी वस्तू, धान्य आणि जीवनावश्यक साहित्य पुराच्या लोंढ्याबरोबर वाहून गेले. देऊळगाव घाटकरांच्या अनेकांच्या विहिरी गाळाने भरून बुजल्या, तर कुणाची घरे काळाच्या कठोर आघाताने जमीनदोस्त झाली. आदिनाथ रामभाऊ मस्के यांच्या दुकानातील किराणा मालाचेही मोठे नुकसान झाले; त्यांच्या उदरनिर्वाहाचा आधार असलेले दुकान पुराच्या तडाख्यात उद्ध्वस्त झाले. अनेकांच्या घरात पाणी शिरले, तर अनेकांची घरेच कोसळली. संसार उभा करण्यासाठी आयुष्यभर कष्टाने जमवलेली भांडीकुंडी, धान्य, कपडे, कागदपत्रे, जनावरे आणि जीवनावश्यक वस्तू क्षणात निसर्गाने हिरावून घेतल्या. पाणी तेव्हा संकट बनून आले होते. मदतीसाठी लोकांचे हात पुढे आले. लोकांना आश्वासने दिली गेली. ज्यांचे घर पडली, गुरे गेली, त्यांच्याही पंचनामे करण्यात आली.शेतकऱ्यांचे पंचनामे झाले.

हे सर्वांनी मान्य केले. मात्र वर्ष उलटले तरी अनेक नुकसानग्रस्तांच्या हातात अपेक्षित अनुदान पोहोचले नाही.आणि म्हणूनच आज एक वर्षानंतर एक प्रश्न देऊळगाव घाटकरांच्या मनात कायम आहे त्या पुरानंतर आम्ही काय कमावलं आणि काय गमावलं?"

### देऊळगाव घाटकरांनी काय गमावलं?

देऊळगाव घाटकर यांनी खूप काही गमावलं...कुणी घर गमावलं...कुणी जनावरं गमावली.. कुणी संसार गमावला.... कुणाच्या कष्टाची वर्षानुवर्षांची पुंजी वाहून गेली.... कुणाच्या डोळ्यांतील भविष्याची स्वप्नं त्या पुराच्या पाण्यात विरून गेली...

### देऊळगाव घाटकर यांनी काय कमावलं

या एका वर्षात देऊळगाव घाटकरांनी एक गोष्ट नक्की कमावली—एकमेकांसाठी उभं राहण्याची ताकद.... संकटाशी लढण्याची जिद्दकमावली.. पुन्हा उभे राहण्याची हिंमत कमावली...संकटाच्या काळात गाव एकत्र आलं... एकाच्या दुःखात दुसरा सहभागी झाला.... मदतीचे हात पुढे आले... पुन्हा उभं राहण्याची जिद्द निर्माण झाली..

### एक वर्षात खूप काही बदल.

पण आज परिस्थितीने पुन्हा एक वेगळा प्रश्न उभा केला आहे. एक वर्षापूर्वी पाण्यामुळे हाल झाले होते;आज पाणी नसल्यामुळे हाल होत आहेत. ज्या नदीच्या पुराने वर्षभरापूर्वी लोकांचे संसार उद्ध्वस्त केले, त्याच नदीकडे आज शेतकरी आणि ग्रामस्थ आशेने पाहत आहेत. पाऊस कमी झाला की पाणीटंचाई, शेतीची चिंता, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची समस्याने पुन्हा डोके वर काढले आहे.

. चौकट

नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना न्याय नाही निसर्गाने एक वर्षात देऊळगाव घाटला दोन टोकांची अनुभूती दिली तेव्हा पाणी जास्त होतं म्हणून संकट होतं,आज पाणी कमी आहे म्हणून संकट आहे. मात्र या दोन संकटांच्या मध्ये सर्वात मोठा प्रश्न आहे तो व्यवस्थेचा आणि मदतीचा. पुराच्या पाण्यात सर्वस्व गमावलेल्या कुटुंबांनी वर्षभर वाट पाहिली. शासनाच्या मदतीची, नुकसानभरपाईची, आपल्या दुःखाची दखल घेतली जाण्याची...

पण वर्ष उलटून गेले तरी अनेकांच्या जखमा ताज्याच आहेत.आज या घटनेला एक वर्ष पूर्ण होत असताना केवळ त्या पुराची आठवण काढून चालणार नाही. त्या घटनेतून आपण काय शिकलो, काय बदल झाले आणि नुकसानग्रस्तांना खरोखर न्याय मिळाला का, याचा विचार करण्याची ही वेळ आहे.

### शासनाच्या मदतीपासून वंचित

आज या घटनेला एक वर्ष पूर्ण होऊनही शासनाने या शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची मदत अजूनही दिलेली नाही. पांडुरंग दानवे यांचे घराचे नुकसान झाले,त्यांची गुरव वाहून गेली, राजू रामदास ठोंबरे यांचे संसार उपयोगी संपूर्ण वस्तू वाहून गेल्या, आदिनाथ मस्के यांच्या दुकानातील मालाचे अतोनात नुकसाक झाल्यानंतरही मदतीची वाट पाहत असलेल्या अनेकांच्या मनातील शासनावरील आशा.आज एक वर्षानंतर देऊळगाव घाटकरांना केवळ सहानुभूती नको आहे.


त्यांना त्यांच्या नुकसानीची दखल हवी आहे..

### देऊळगाव घटकारांचा एकच प्रश्न

- **एक वर्ष झालं...**
- **निसर्गाने दिलेली जखम अजून भरलेली नाही. आणि आता पाण्याअभावी नवी चिंता उभी राहिली आहे.**
- **देऊळगा घाटकरांचा प्रश्न आजही तोचपुरात आम्ही जे गमावलं, त्याची भरपाई कधी होणार? आणि आज पाण्याअभावी निर्माण झालेल्या संकटातून आम्हाला बाहेर कधी काढणार?... देऊळगाव घाटकरांच्या वेदनेला आणि संघर्षाला सलाम.**



# स्व.सुवालालजी वाकेकर स्मृती पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, भुमिपूत्र भरत गित्ते होणार सन्मानित





## मराठवाडा साहित्य परिषदेच्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे रविवारी वितरण


### राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ. कविता गीते यांचा होणार सत्कार, आयकर आयुक्त विश्वास मुंडे यांची राहणार उपस्थिती

### शानदार सोहळ्यास नागरिकांनी मोठय़ा संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

स्व.सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठानच्या प्रतिष्ठित पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, भुमिपूत्र भरत गित्ते यांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुण्याचे आयकर आयुक्त विश्वास मुंडे यांच्या हस्ते हा गौरव होणार असुन मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक, पुरस्काराचेही येत्या रविवारी (दि. 20 सप्टेंबर) एका शानदार समारंभात वितरण केले जाणार आहे. याच कार्यक्रमात राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ. कविता गीते यांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठय़ा संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव राजकुमार यल्लावाड व संयोजकांनी केले आहे.




विश्वास पाटील


भरत गित्ते


डॉ.कविता गित्ते


अंजली कुलकर्णी


शशिकला फुंदे


मनिषा सरवदे


प्रियतमा कराड


प्राजक्ता खानापूरे


संदिपान फड


श्रीकांत बोबडे


श्रीहरी केंद्रे


मिलिंद साळवे


निवृत्ती यवले


सय्यद आमेर


शंकर मामीलवाड

गेल्या १५ वर्षापासून साहित्य परिषदेच्या वतीने परळी परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, साहित्य आदी क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणार्या शिक्षकांचा व इतर मान्यवरांचा साहित्य परिषदेच्या वतीने गौरव केला जातो. यावर्षी स्व.सुवालालजी वाकेकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा साहित्य गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांना जाहीर झाला आहे. उद्योग क्षेत्रात ज्यांनी परळीचे नाव सातासमुद्रापार नेले, असे परळीचे भुमिपुत्र भरत गित्ते यांना उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेले आदर्श शिक्षक अंजली वसंतराव कुलकर्णी (कै.दे.बा.गणगे योगेश्वरी नुतन प्रा.शाळा, अंबाजोगाई), शशिकला नरसोबा फुंदे (रत्नेश्वर विद्यालय,टोकवाडी), मनिषा गुलाबराव सरवदे (पी.एम.श्री.जि.प.केंद्रीय प्रा.शाळा सिरसाळा), प्रियतमा विष्णू कराड (जि.प.प्रा.शाळा, टोकवाडी), प्राजक्ता चंद्रशेखर खानापुरे (नविन प्राथमिक शाळा, थर्मल परळी), संदिपान रामभाऊ फड (सोमेश्वर विद्यालय, जिरेवाडी), श्रीकांत जनार्दन बोबडे (प्राथमिक आश्रमशाळा, वंसतनगर), श्रीहरी बाबुराव केंद्रे (आदर्श विद्यालय,मांडवा), मिलिंद राणोजी साळवे (शारदा विद्यामंदिर, परळी), निवृत्ती नामदेव यवले (संत धुराबाई आदर्श प्रा.शाळा, परळी), सय्यद आमेर सय्यद जमील (जि.प.उर्दु प्रा. शाळा, सिरसाळा) तर स्व.सुवालालजी वाकेकर सेवागौरव पुरस्कारासाठी नुकतेच जि.प.प्रा.शाळा, सारडगाव येथून सेवानिवृत्त झालेले मुख्याध्यापक शंकर जयवंतराव मामीलवाड यांची निवड करण्यात आली असून या सर्वांचा याच सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे.

### रविवारी होणार शानदार सोहळा

**रविवार दिनांक 20 सप्टेंबर रोजी सायंकाळी 4.30 वाजता वैद्यनाथ महाविद्यालयाच्या सभागृहात हा शानदार कार्यक्रम होणार आहे. पुरस्काराचे वितरण पुण्याचे आयकर आयुक्त विश्वास मुंडे यांच्या हस्ते होणार असुन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर भूषविणार आहेत. मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष कॉ. पी. एस. घाडगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या समारंभाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा साहित्य परिषदेचे सचिव प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांच्यासह कार्याध्यक्ष अनंत मुंडे, उपाध्यक्ष अरुण पवार, कोषाध्यक्ष प्रा.संजय अघाव, सहसचिव दिवाकर जोशी, प्रा.अर्चना चव्हाण, संपर्क प्रमुख बालाजी कांबळे, प्रसिद्धी प्रमुख सिध्देश्वर इंगोले व त्यांच्या सहकार्यांनी दिली.**


# पुराच्या जखमा अजून ताज्याच.. अनुदानाची प्रतीक्षा मात्र कायम?

## एक वर्षात देऊळगाव घाट करनी काय कमावलं? काय गमावलं?..

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आज बरोबर एक वर्षांपूर्वी 15 सप्टेंबर 2025 या दिवशी रात्री झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे देऊळगाव घाट येथील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते.आज देऊळगाव घाटच्या त्या काळ्या दिवसाला एक वर्ष पूर्ण होत आहे. ही घटना 15 सप्टेंबर 2025 रोजी घडली होती. त्या दिवशी ढगफुटीसदृश्य पावसाने देऊळगाव घाट परिसराला अक्षरशः हादरवून सोडले होते. काही तासांच्या मुसळधार पावसाने नदी-नाल्यांना आलेल्या पुरामुळे अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले.त्या पुराची आठवण आजही अंगावर काटा आणते.पांडुरंग किसन दानवे यांची गुरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. घरातील संपूर्ण संसार डोळ्यादेखत पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. राजू रामदास ठोंबरे यांच्या घरातील संसारोपयोगी वस्तू, धान्य आणि जीवनावश्यक साहित्य पुराच्या लोंढ्याबरोबर वाहून गेले. देऊळगाव घाटकरांच्या अनेकांच्या विहिरी गाळाने भरून बुजल्या, तर कुणाची घरे काळाच्या कठोर आघाताने जमीनदोस्त झाली. आदिनाथ रामभाऊ मस्के यांच्या दुकानातील किराणा मालाचेही मोठे नुकसान झाले; त्यांच्या उदरनिर्वाहाचा आधार असलेले दुकान पुराच्या तडाख्यात उद्ध्वस्त झाले. अनेकांच्या घरात पाणी शिरले, तर अनेकांची घरेच कोसळली. संसार उभा करण्यासाठी आयुष्यभर कष्टाने जमवलेली भांडीकुंडी, धान्य, कपडे, कागदपत्रे, जनावरे आणि जीवनावश्यक वस्तू क्षणात निसर्गाने हिरावून घेतल्या.

पाणी तेव्हा संकट बनून आले होते. मदतीसाठी लोकांचे हात पुढे आले. लोकांना आश्वासने दिली गेली. ज्यांचे घर पडली, गुरे गेली, त्यांच्याही पंचनामे करण्यात आली.शेतकऱ्यांचे पंचनामे झाले.



हे सर्वांनी मान्य केले. मात्र वर्ष उलटले तरी अनेक नुकसानग्रस्तांच्या हातात अपेक्षित अनुदान पोहोचले नाही. आणि म्हणूनच आज एक वर्षानंतर एक प्रश्न देऊळगाव घाटकरांच्या मनात कायम आहे त्या पुरानंतर आम्ही काय कमावलं आणि काय गमावलं?"

■ **देऊळगाव घाटकरांनी काय गमावलं?**

देऊळगाव घाटकर यांनी खूप काही गमावलं...कुणी घर गमावलं...कुणी जनावरं गमावली.. कुणी संसार गमावला.... कुणाच्या कष्टाची वर्षानुवर्षांची पुंजी वाहून गेली.... कुणाच्या डोळ्यांतील भविष्याची स्वप्नं त्या पुराच्या पाण्यात विरून गेली...

■ **देऊळगाव घाटकर यांनी काय कमावलं**

या एका वर्षात देऊळगाव घाटकरांनी एक गोष्ट नक्की कमावली—एकमेकांसाठी उभं राहण्याची ताकद.... संकटाशी लढण्याची जिद्दकमावली.. पुन्हा उभे राहण्याची हिंमत कमावली...संकटाच्या काळात गाव एकत्र आलं... एकाच्या दुःखात दुसरा सहभागी झाला.... मदतीचे हात पुढे आले... पुन्हा उभं राहण्याची जिद्द निर्माण झाली..

■ **एक वर्षात खूप काही बदल.**

पण आज परिस्थितीने पुन्हा एक वेगळा प्रश्न उभा केला आहे.

एक वर्षापूर्वी पाण्यामुळे हाल झाले होते;आज पाणी नसल्यामुळे हाल होत आहेत.

ज्या नदीच्या पुराने वर्षभरापूर्वी लोकांचे संसार उद्ध्वस्त केले, त्याच नदीकडे आज शेतकरी आणि ग्रामस्थ आशेने पाहत आहेत. पाऊस कमी झाला की पाणीटंचाई, शेतीची चिंता, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची समस्याने पुन्हा डोके वर काढले आहे.

■ **नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना न्याय नाही**

निसर्गाने एक वर्षात देऊळगाव घाटला दोन टोकांची अनुभूती दिली तेव्हा पाणी जास्त होतं म्हणून संकट होतं,आज पाणी कमी आहे म्हणून संकट आहे.

मात्र या दोन संकटांच्या मध्ये सर्वात मोठा प्रश्न आहे तो व्यवस्थेचा आणि मदतीचा.

पुराच्या पाण्यात सर्वस्व गमावलेल्या कुटुंबांनी वर्षभर वाट पाहिली. शासनाच्या मदतीची, नुकसानभरपाईची, आपल्या दुःखाची दखल घेतली जाण्याची...

पण वर्ष उलटून गेले तरी अनेकांच्या जखमा ताज्याच आहेत.आज या घटनेला एक वर्ष पूर्ण होत असताना केवळ त्या पुराची आठवण काढून चालणार नाही. त्या घटनेतून आपण काय शिकलो, काय बदल झाले आणि नुकसानग्रस्तांना खरोखर न्याय मिळाला का, याचा विचार करण्याची ही वेळ आहे.

■ **शासनाच्या मदतीपासून वंचित**

आज या घटनेला एक वर्ष पूर्ण होऊनही शासनाने या शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची मदत अजूनही दिलेली नाही. पांडुरंग दानवे यांचे घराचे नुकसान झाले,त्यांची गुरव वाहून गेली, राजू रामदास ठोंबरे यांचे संसार उपयोगी संपूर्ण वस्तू वाहून गेल्या, आदिनाथ मस्के यांच्या दुकानातील मालाचे अतोनात नुकसाक झाल्यानंतरही मदतीची वाट पाहत असलेल्या अनेकांच्या मनातील शासनावरील आशा.आज एक वर्षानंतर देऊळगाव घाटकरांना केवळ सहानुभूती नको आहे.

त्यांना त्यांच्या नुकसानीची दखल हवी आहे..

■ **देऊळगाव घटकारांचा एकच प्रश्न**

एक वर्ष झालं...

निसर्गाने दिलेली जखम अजून भरलेली नाही.

आणि आता पाण्याअभावी नवी चिंता उभी राहिली आहे.

देऊळगा घाटकरांचा प्रश्न आजही तोचपुरात आम्ही जे गमावलं, त्याची भरपाई कधी होणार?

आणि आज पाण्याअभावी निर्माण झालेल्या संकटातून आम्हाला बाहेर कधी काढणार?...

देऊळगाव घाटकरांच्या वेदनेला आणि संघर्षाला सलाम.





दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, बुधवार, १६ सप्टेंबर 2026


## थेऊरचा चिंतामणी



**अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत**

पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाई-च्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते.


महाराष्ट्रातील या विशिष्ट 'आठ' ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून 'अष्टविनायक' म्हणले जाते. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत.

**गणपती ही विद्येची देवता असून तो, सुख-कर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.**

अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंतामणी हा दुसरा गणपती आहे. चिंचवडचे सत्पुरुष श्री चिंतामणि महाराज देव यांनी सुमारें ४०,००० रु. खर्चून है गणमतिमंदिर बांधले. चिंचवडकर श्री नारायण महाराज तथा श्रीधरणीधर महाराज यांच्या काळात या वैभवात भर घालण्यात आली आहे. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनीं थोरले माधव-राव पेशवे यांनी देवालयाचा सागवानी लाकडाचा घडवलेला भव्य सभामंडप श्रीचरणी समर्पित केला व देवळाचा विस्तार वाढविला. त्यानंतर हरीपंत फडके यांनी व इतर अनेक भक्तांनी या देवालयांची शोभा व भव्यता वाढविली आहे. श्री मंदिराला पेशवेकालीन भव्य तटबंदी असून त्यात प्रशस्त ओवऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत. पुण्या-तील पेशव्यांच्या घरातील अनेक जण थेऊरला सतत येत असत. पेशवे घराणे खूप मोठे गणेशभक्त होते. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला.[७] माधवराव पेशव्यांचे निधन थेऊरलाच झाले. यांच्याबरोबर सती गेलेल्या रमाबाई यांची समाधीदेखील या ठिकाणी आहे.

श्रीचिंतामणींची मूर्ती भव्य, पूर्वाभिमुख व डाव्या सोंडेची आहे. मूर्ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत आहे. श्री मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उत्तरमुखी असून श्री चिंतामणीचा विग्रह पूर्वाभिमुखी आहे. देवा-लयाचा महादरवाजा उत्तरेकडे तोंड करून आहे. मुख्य मंदिराच्या बाहेर तीन बाजूंना तीन कोना-ड्यात तीन छोट्या मूर्ती आहेत. उत्तर दिशेला दक्षि-णमुखी हनुमान स्थापित आहेत. श्री चिंतामणीच्या पाठीशी पश्चिमेला असणाऱ्या गणेशांना लंबोदर गणेश अशी संज्ञा आहे. श्री मुद्गल पुराणात पश्चिम दिशेची देवता म्हणून श्री लम्बोदरांचे वर्णन आहे. तर उत्तर दिशेला उत्तरेश्वर नावाच्या गणेशाची स्थापना केली आहे. मंदिरात प्रवेश करताच लक्ष वेधून घेणाऱ्या विशाल दीपमाला दिमाखात उभ्या आहेत. श्री चिमाजीअप्पा यांनी वसईच्या विजयाच्या वेळी पोर्तुगीजां कडून हस्तगत केलेली विशाल घंटा श्रीचिंतामणींच्या प्रांगणाचे एक विशेष आकर्षण आहे. ज्या स्थानी कपिल महर्षींनी श्री चिंतामणींना त्यांचे चिंतामणी रत्न परत केले. त्या स्थानी कदंब वृक्ष नावाने आजही भव्य वृक्ष पाहायला मिळतो.

थेऊर हे गाव, पुणे-सोलापूर महामार्गाला जोडले-ल्या रस्त्यावर, तालुक्यात असून पुण्यापासून हे ३० कि. मी. अंतरावर आहे. पुण्यापासून बसेसची सोय आहे.



# सिरसाळा येथे बेकायदेशीर शिंदी विक्रीवर पोलिसांची मोठी कारवाई

## 15 हजारांचा मुद्देमाल नष्ट, 67 वर्षांच्या वृद्धावर गुन्हा दाखल; सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली दबंग कारवाई

**सिरसाळा (अतुल बडे)**

परळी तालुक्यातील सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर दारू आणि अमली पदार्थांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. गावातील एका ६७ वर्षीय वृद्धाच्या घराशेजारी विनापरवाना शिंदीची चोरटी विक्री होत असल्याचा पर्दाफाश करत पोलिसांनी ऐनवेळी धाड टाकून माल जप्त केला व जागेवरच नष्ट केला.

**■ घटना व कारवाईचा सविस्तर तपशील**

९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६:३५ वाजेच्या सुमारास सिरसाळा येथील राहत्या घराच्या पत्र्याच्या शेडजवळ मोकळ्या जागेत बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस शिपायाने घटनास्थळी छापा टाकला.

यामध्ये आरोपी जयवंत हिरामन नकलवार (वय ६७ वर्ष, रा. सिरसाळा, ता. परळी, जि. बीड) यांच्यावर कारवाई करत २०० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये १०० रुपये प्रतिलिटर दराने मिळून आलेली सुमारे १५० लिटर तयार पांढऱ्या रंगाची शिंदी (एकूण किंमत ₹५,०००/-) मालातील १८० एमएल शिंदी तपासासाठी






आणि रासायनिक पृथक्करणासाठी सीलबंद काचेच्या बाटलीत पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आली. उर्वरित संपूर्ण १५० लिटर शिंदी पंचांच्या समक्ष जागेवरच नष्ट करण्यात आली.

सदरची कारवाई पो.शि. लहु निवृत्ती वाघमारे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे (गुन्हा रजिस्टर क्र. २५६/२०२६). सदर गुन्हा रात्री ८:३७ वाजता दाखल अंमलदार पोलीस नाईक इंगेवाड (बॅच क्र. ५७२) यांनी नोंदवला.

सिरसाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक स.पो.नि राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सोनवणे (बॅच क्र. १३५६) या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

# भगवान महाविद्यालयात हिंदी पंधरवडा व आजीवन शिक्षण विभागाच्या उपक्रमांचे उद्घाटन




**आष्टी | प्रतिनिधी**

येथील भगवान महाविद्यालयामध्ये हिंदी विभाग आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने हिंदी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवार दि 15 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 11:30 वाजता संपन्न झाले. या कार्यक्रमांमध्ये आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वर्षभरातील कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ तर प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन राजूकाका धोंडे हे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये 5 ऑगस्ट रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भीमरावजी धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या पोस्टर प्रेसेंटेशन, रांगोळी स्पर्धा व तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिल हजारे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य व हिंदी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. अप्पाराव टाळके यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये हिंदी पंधरवड्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी जे उपक्रम राबवले जाणार आहेत याविषयी माहिती दिली, तसेच आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वर्षभरातील कार्यक्रमांची माहिती देऊन या विभागाच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या सर्टिफिकेट कोर्सेची माहिती दिली.

यावेळी मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य हे उपस्थित होते. मंचावर उपस्थित असलेल्या अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य निशिगंध सर यांनी राजभाषा हिंदी विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या राजू काका धोंडे यांनी हिंदी पंधरवड्या निमित्त घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाविषयी आपले मत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या तसेच साहेबांच्या वाढदिवसानिमित्त बक्षीस मिळवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेऊन, हिंदी राष्ट्रभाषा आणि राजभाषा याविषयी सविस्तर मत व्यक्त केले तसेच, आजीवन विभागाच्या कार्यक्रमाविषयी आणि त्यांच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या कोर्सेस विषयी आपले मत व्यक्त करताना उपस्थित विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे सांगितले. त्याचबरोबर धोंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन करून बक्षीस न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी पुढील वर्षी प्रथम क्रमांक मिळवावा अशी प्रेरणा दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीरंग पवार यांनी तर आभार प्रदर्शन आजीवन विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप जरे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिंदी आणि आजीवन विभागाला प्रा. काकासाहेब सोले, प्रोफेसर डॉ. दिगंबर पाटील, डॉ. आबासाहेब पोकळे, डॉ. श्रीकांत धोंडे, प्रा. निसार शेख, प्रा. किशोर धोंडे, प्रा. शेळके, प्रा. गोफणे, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील कलाकारांना मिळाली मोठी संधी; 'विचित्र' वेब सिरीज 17 सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला

आष्टी (प्रतिनिधी) : ग्रामीण भागातील कलाकारांमध्ये प्रचंड कलागुण आणि प्रतिभा दडलेली असली, तरी योग्य संधी आणि व्यासपीठाअभावी अनेक कलाकारांना आपली कला मोठ्या प्रेक्षकांसमोर सादर करता येत नाही. अशा ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांना अभिनय क्षेत्रात संधी देत त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी 'विचित्र' ही वेब सिरीज येत्या १७ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

बाजीज फिल्म प्रस्तुत 'विचित्र' या वेब सिरीजची निर्मिती तन्मय राठोड यांनी केली आहे. विशेष म्हणजे या वेब सिरीजमध्ये आष्टी तालुक्यातील वाघळुज तसेच परिसरातील ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांतील कलाकारांना अभिनयाची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे ही वेब सिरीज केवळ मनोरंजनाच्या दृष्टीनेच नव्हे, तर ग्रामीण भागातील कलाकारांच्या कलाप्रवासाला नवे वळण देणारा उपक्रम म्हणूनही महत्त्वाची ठरणार आहे.ग्रामीण भागात राहून आपल्या अभिनयाची, कलाकौशल्याची जोपासना करणाऱ्या अनेक कलाकारांना या माध्यमातून प्रथमच मोठ्या प्रेक्षकवर्गासमोर येण्याची संधी मिळत आहे. वाघुळज परिसरातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या कलाकारांनी या वेब सिरीजमध्येt सहभाग घेतला असून, स्थानिक कलाकारांच्या सहभागामुळे या कलाकृतीला ग्रामीण मातीचा अस्सल स्पर्श लाभला आहे.'विचित्र' या वेब सिरीजमध्ये ग्रामीण वातावरण, स्थानिक कलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग आणि त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकपणा यामुळे प्रेक्षकांना काहीतरी वेगळे अनुभवायला मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः आपल्या गावातील आणि परिसरातील परिचित चेहरे अभिनय करताना पाहण्याची संधी मिळणार असल्याने आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील कला रसिकांमध्ये या वेब सिरीजबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.



ग्रामीण भागातील कलाकारांना केवळ संधी देणे नव्हे, तर त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळवून देऊन त्यांना मनोरंजन क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा पैलू आहे. शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील कलाकारही दर्जेदार कलाकृती साकारू शकतात, हे 'विचित्र'च्या माध्यमातून अधोरेखित होणार आहे.

१७ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'विचित्र' वेब सिरीजला प्रेक्षकांनी आवर्जून पाहावे आणि आपल्या मातीतल्या कलाकारांना भरभरून दाद द्यावी, असे आवाहन निर्मिती टीमकडून करण्यात आले आहे. ग्रामीण भागातून पुढे येणाऱ्या या कलाकारांना प्रेक्षकांचे प्रेम आणि प्रोत्साहन मिळाल्यास भविष्यात आणखी अनेक नवोदित कलाकारांना मनोरंजन क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# संता माय मंदिराचे कलशारोहण संपन्न

**महागाव** : महागाव तालुक्यातील काळी (दौ.) येथील जागृत देवस्थाना असलेल्या संता माय मंदिराचे नुकतेच नवीन बांधकाम करण्यात आले होते. हे मंदिर जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या संता मायेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करीत संता माय यांच्या मूर्तीची मंदिरामध्ये उपस्थित संत बालयोगी परमपूज्य व्यंकटस्वामी महाराज,जगदीश बाबा भारती, ह. भ.प.तानाजी बापू मुडाणकर, अखिल भारतीय बंजारा कवी ज्योतीराम महाराज वनोली कर तसेच लोकनेत्या पुसदच्या प्रथम नागरिक नगराध्यक्ष मोहिनी ताई नाईक यांच्या उपस्थितीत संतामाळी यांना सिंहासनावर विराजमान करण्यात आले. जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या काळी (दौ.) येथील संता माय यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा तसेच कलशारोहणाच्या कार्यक्रमानिमित्त सकाळी ८ वाजता संता माय मंदिर प्रांगणातून कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेमध्ये मुली, महिला,बालगोपाल, भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही कलाशय यात्रा संता माय यांचे मंदिरापासून काळी (दौ.)च्या मुख्य बाजारपेठेमधून बस स्टॅन्ड मार्गे वसंतराव नाईक चौक, गांधी चौक, मज्जिद परिसर या मार्गाने परत देवाचा वाडा येथे संतामाय मंदिराजवळ कलशय यात्रेचे समापन करण्यात आले.

उपस्थित संत म्हणतांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा तसेच कलश रोहन करण्यात आले. याप्रसंगी लोकनेत्या मोहिनीताई नाईक यांनी जागृत



देवस्थान संतामाय यांचे गुणगान करीत या मंदिराला तसेच या परिसरातील धार्मिक देवस्थानांना कोणत्याच प्रकारचा निधी कमी पडणार नाही. याची दक्षता घेऊन योग्य तो निधी मा. इंद्रनील नाईक यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करेल असे आश्वासित केले.

संत महंत तसेच धार्मिक भक्तगणांच्या उपस्थितीत महाप्रसादाच्या कार्यक्रमाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.याप्रसंगी संता माय यांना मानणारा मोठा वर्ग उपस्थित होता. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संता माय भक्तांनी अटक परिश्रम घेतले. संता माय संस्थानचे प्रसिद्धी प्रमुख हंसराज मोरे यांनी उपस्थित संत महंत प्रतिष्ठित नागरिक भक्तागण यांचे आभार व्यक्त केले.


दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)